| | | | |
|---|---|---|---|
| | | **जिल्हा परिषद रत्नागिरी**<br>भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,<br>माळनाका रत्नागिरी ४१५६१२ | |
| | **आरोग्य विभाग** | | |
| दुरध्वनी क्रमांक<br>०२३५२-२२१४०३ | **बेटी बचाओ, बेटी पढाओ** | | ईमेल आयडी<br>dhozpratnagiri@gmail.com |


जाक्र/ रजिप/ आवि/ टे.१३-२/ 5098 / २०२४ दिनांक - ०१/०८/२०२४.

01 AUG 2024

प्रति,

गट विकास अधिकारी ,

तथा अध्यक्ष तालुकास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समिती, पं. स. सर्व, जि. - रत्नागिरी.

**विषय - खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे विविध शैक्षणिक अर्हता आणि संबंधीत मान्यताप्राप्त चिकित्सापध्दती बाबत**

संदर्भ - १) शासन निर्णय क्र. सीआयएम/१०९१/सीआर/१७२/९१/एमईडी-८,मंत्रालय मुंबई दि.-५ सप्टेंबर १९९१

२) शासन परिपत्रक महाराष्ट्र शासन वैदयकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन परिपत्रक क्र. सीआयएम-२०००/१३४८/प्र. क्र.१८३/२०००/अधिनियम मंत्रालय मुंबई दि. १९ ऑगस्ट २०००

३) शासन परिपत्रक महाराष्ट्र शासन वैदयकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन परिपत्रक क्र.सीआयएम-२००४/प्र.क.१२/०४/अधिनियम मंत्रालय मुंबई ४०००३२, दि. ५ ऑगस्ट २००८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांकडे असणाऱ्या विविध शैक्षणिक अर्हता आणि त्या अनुषंगाने त्यांनी उपचारासाठी वापरावयाच्या तत्सम चिकित्सापद्ध आणि नोंदणीकृत परिषद याची माहिती पाठवण्यात येत आहे. याची सर्वांनी आपल्या नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| १) | **एम.बी.बी.एस.** | १) अ‍ॅलोपॅथी चिकित्सा पद्धती<br>( महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल / MMC )<br>( मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया / MCI ) |
| २) | **बी.ए.एम.एस.** | १) आयुर्वेद आणि एलोपॅथी चिकित्सा पद्धती<br>( महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन / MCIM )<br>( सेन्ट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन / CCIM)<br>शेड्यूल A, A१ आणि D यांना अ‍ॅलोपॅथी चिकित्सा पद्धती उपचारास मान्यता आहे. |
| ३) | **बी.यु.एम.एस.** | १) युनानी आणि अ‍ॅलोपॅथी चिकित्सा पद्धती<br>( महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन / MCIM)<br>( सेन्ट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन CCIM)<br>शेड्यूल D यांना अ‍ॅलोपॅथी चिकित्सा पद्धती उपचारास मान्यता आहे. |
| ४) | **बी.एच.एम.एस.** | १) होमिओपॅथी चिकित्सा पद्धती<br>( महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी / MCH )<br>( सेन्ट्रल कौन्सिल ऑफ होमिओपॅथी / CCH )<br>२) Note - C.C.M.P.ही महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त पदविका प्राप्त करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांना अ‍ॅलोपॅथी चिकित्सा पद्धती उपचारास मान्यता आहे. |
| ५) | **बी.डी.एस.** | १) दंतरोग चिकित्सा अ‍ॅलोपॅथी चिकित्सा पद्धती<br>( महाराष्ट्र डेंटल कौन्सिल / M.D.C.) ( डेंटल कौन्सिल ऑफ इंडिया / D.C.I.) |
| ६) | **बी.एन.वाय.एस.** | १) निसर्गोपचार चिकित्सा पद्धती / आयुष मंत्रालय द्वारा निर्देशित इतर उपचार पद्धती / mode ऑफ therapy जसे Acupuncture, Magnetotherapy इत्यादी<br>( सेन्ट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन योगा अँड नैचरोपॅथी )<br>(आयुष मंत्रालय द्वारा मान्यताप्राप्त महाविद्यालय)<br>२)Note- Can use prefix DR. As per the letter no. F.N.-17-18 (Punjab) CCRYN/ 2012 -13 / RTI (Trg & Regn ) / 363 Dated - 09/ 09 / 2020 |

| | | |
|---|---|---|
| ७) | **CMS & ED** | १) Paramedical & CMS & ED courses सुरु करणे अथया चालवणे साठी भारतीय आयुर्विज्ञान परिषद यांची परवानगी आवश्यक नाही असे नमूद केले आहे.<br>CMS ED certificate and diploma courses does not come under the purview of MEDICAL COUNCIL OF INDIA ref.letter no. MCI-23 (1) / med-2018/ PG/ 134380 Dated 0 4 SEPT 2018<br>२) या पदवीचे पदवीधारक हे त्यांना जागतिक आरोग्य संघटनेने वेळोवेळी मान्यता दिलेली 44 अॅलोपॅथी औषधे वापरू शकतात.<br>३) परंतु ते डॉक्टर वा तत्सम संबोधन त्यांच्या नांवा मागे लागू शकत नाहीत.<br>४) सदर पदवीधर हे ग्रामीण भागामध्ये community health worker/field worker प्रमाणे PREVENTIVE, PROMOTIVE, CURATIVE काम करू शकतात.<br>५) MCI/ MMC/ MCIM/ CCIM/ MCH/ CCH/ DCI / MDC यापैकी कोणत्याही अधिकृत परिषदेकडे नोंदणी होत नाही. |
| ८) | **B. E. M. S.** | १) इलेक्ट्रोपॅथी / इलेक्ट्रोहोमिओपॅथी याच चिकित्सा पद्धतीचा अवलंब करून उपचार करू शकतात.<br>२)MCI/ MMC/ MCIM/ CCIM/ MCH/ CCH/ DCI/ MDC यापैकी कोणत्याही अधिकृत परिषदेकडे नोंदणी होत नाही.<br>३) Note -MCIM मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय अथवा तत्सम परिषद नसल्याने नोंदणी प्रमाणपत्र पडताळणी करता येत नाही.<br>४) महाराष्ट्र शासन उपसचिव यांचे दिनांक-२५/०६/२०१४ चे पत्र संकीर्ण ०११४/ प्र.क्र. १५३/ १४/ अधिनियम, महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नवीन मंत्रालय, ७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, मुंबई ४००००१ दि. २५ जून २०१४<br>आणि<br>महाराष्ट्र शासन म. वैद्यक ०६१७/ प्र.क्र.१४०/ अधिनियम वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, मुंबई ४००००१ दि.२२ जानेवारी २०१८ ते महाराष्ट्र वैद्यक व्यावसायी अधिनियम १९६१ मधील नोंदणी शिवाय, खालील अटींच्या अधीन राहून, इलेक्ट्रोपॅथी / इलेक्ट्रोहोमिओपॅथीचा व्यवसाय करू शकतील. |
| | अटी :- | १) उक्त व्यक्ती हे वैद्यक व्यवसायी म्हणून मानण्यात येणार नाहीत किंवा त्यांना वैद्यक व्यवसायी असल्याचा दावा करता येणार नाही.<br>२) उक्त व्यक्ती आपल्या नावापुढे व नंतर "डॉक्टर" किंवा तत्सम पदवी लावू शकणार नाहीत.<br>३) उक्त व्यक्ती आपल्या रुग्णालयाच्या / दवाखान्यातच्या बोर्डावर अथवा त्यांचे लेटरहेडवर, स्वताच्या नावामागे व पुढे "डॉक्टर", "वैद्य", "हकीम" किंवा तत्सम पदवी लावू शकणार नाहीत.<br>४) उक्त व्यक्ती फक्त इलेक्ट्रोपॅथी / इलेक्ट्रोहोमिओपॅथीचीच औषधे रुग्णांना देवू शकतील ५ व इतर कोणत्याही चिकित्सा पद्धतीची औषधे रुग्णांना देता येणार नाही.)<br>उक्त व्यक्ती हि फक्त इलेक्ट्रोपॅथी / इलेक्ट्रोहोमिओपॅथीचीच औषधे रुग्णांना लिहून देवू शकतील व त्या पद्धतीच्या औषधांचा साठा रुग्णालयात/दवाखान्यात ठेवू शकतील व इतर कोणताही चिकित्सा पद्धतीची औषधे रुग्णांना लिहून देवू शकणार नाही व अन्य चिकित्सा पद्धतीच्या औषधांचा साठा ठेवू शकणार नाहीत. |
| ९ | **Altarnetive medicine -** | १) महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन परिपत्रक क्र. एम. आय.एस २००३/१०८६/प्र.क्र.३५१/०३ अधिनियम, मंत्रालय मुंबई दि.१६ एप्रिल २००४ या शासन परिपत्रकामध्ये परिच्छेद २ अन्वये शासनाने alopathy, आयुर्वेद व सिद्ध, युनानी व होमिओपॅथी या चिकित्सा पद्धती खेरीज अन्य कोणत्याही चिकित्सा पद्धती जसे इलेक्ट्रोपॅथी / इलेक्ट्रो होमिओपॅथी व अल्टरनेटीव सिस्टीम ऑफ मेडिसिन जसे अक्युपंक्चर, magnetotherapy, hipnotherapy इत्यादी चिकित्सा पद्धती व या संज्ञेखाली येणाऱ्या विविध पॅथीना मान्यता दिलेली नाही. |
| | | **तथापि (१)-**<br>अक्युपंक्चर व हिप्नोथेरपी या आरोग्य विज्ञानाच्या दोन शाखांना स्वतंत्र चिकित्सा पद्धती (seperate system) म्हणून मान्यता दिलेली नाही. परंतु या शाखांना उपचार पद्धतीचे प्रकार म्हणजे MODE OF THERAPY म्हणून मान्यता दिली आहे. याबाबत केंद्र शासनाचे निर्देश |

| | | |
|---|---|---|
| | | आहेत कि या दोन शाखांमधील व्यवसाय नोंदणीकृत वैद्यक व्यावसायी अथया योग्य प्रकारे प्रशिक्षित व्यक्ती करू शकतात. या शाखांचे अभ्यासक्रम हे केवळ सर्टिफिकेट कोर्सेस स्वरूपाचे असावेत आणि केवळ नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांसाठीच चालवण्यात यावेत असे नमूद केले आहे. |
| | | **तथापि (२)-**<br>**( सुधारित मार्गदर्शन - ८/१२/२०२२ )**<br>मा. महाराष्ट राज्य दंत परिषद यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.१६५४/ २०२२/२०२३ दिनांक-०८/१२/२०२२ अन्वये "महाराष्ट्र अक्यूपंक्चर चिकित्सा पद्धती अधिनियम २०१५" अन्वये अक्यूपंक्चर चिकित्सा पद्धती वापरणाऱ्या व्यावसायिकांच्या पडताळणीबाबत आवश्यकतेनुसार नोंदणी प्रमाणपत्र शहानिशा संबंधित परिषद कार्यालयाकडून करून घेता येईल असे कळवले आहे.अक्यूपंक्चर चिकित्सा पद्धती वापरणाऱ्या खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांची पडताळणी करताना तालुका आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव तालुका स्तरीय बोगस डॉक्टर चौकशी समिती पंचायत समिती (सर्व), यांनी पडताळणी करताना आवश्यकतेनुसार नोंदणी प्रमाणपत्रांची शहानिशा प्रबंधक, महाराष्ट्र अक्यूपंक्चर परिषद, मुंबई यांचेकडून करून घ्यावयाची आहे, याची नोंद घेणेबाबत संबंधिताना कळविण्यात येत आहे. या संदर्भान्वये सर्व तालुका आरोग्य अधिकारी यांना पत्राद्वारे सूचित करण्यात येत आहे. |

सदर माहितीचे संकलन हे विविध शासन निर्णय आणि परिपत्रके यांचे आधारे करण्यात आले असून, बोगस डॉक्टर / अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय विषयक वेळोवेळी होणारे शासन निर्णय, मा.न्याय संस्थाद्वारे होणारे सर्वच निर्णय सदर पत्रात नमूद असतीलच असे नाही. सबब सदर पत्राचा उपयोग प्रशिक्षण, प्रबोधन याकरिता करण्यात यावा, अनधिकृत वैद्यकीय व्यवसायिक यांचेवर कार्यवाही करताना सदर पत्रातील संदर्भासोबत उपलब्ध सर्व शासन निर्णय / अधिनियम आणि मा. न्यायसंस्थांचे आदेश यांचा सर्वतोपरी अवलंब करण्यात यावा, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सोबत- संदर्भिय शासन निर्णय व परिपत्रके

( डॉ. अनिरुध्द आठल्ये )
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर -**

१) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समिती रत्नागिरी.
२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद रत्नागिरी.
३) मा.पोलीस अधिक्षक, जिल्हा रत्नागिरी.
४) मा. पोलीस उपअधिक्षक, (गृह) तथा सदस्य सचिव जिल्हास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समिती रत्नागिरी.

**प्रत योग्यत्या कार्यवाही साठी -**

१) तालुका आरोग्य अधिकारी, तथा सचिव तालुकास्तरीय बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समिती तालुका - (सर्व) जि. रत्नागिरी

२/- सदर पत्राचे आणि शासन निर्णयाचे अवलोकन करून आपल्या अधिनस्त सर्व वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांना मासिक आढावा बैठकी मध्ये सूचित करावे / मार्गदर्शन करावे, तसेच यापूर्वी आपल्याला इमेल द्वारे सादर करण्यात आलेली सर्व शासन निर्णय आणि परिपत्रके विषयक माहिती पुढील कार्यवाहीस्तव हार्डकॉपी मध्ये **नियमित "अ" अभिलेख वर्गीकरण** अंतर्गत संग्रही ठेवावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

D:\Gimhavanekar\T13 -2023\Bogas Doctor\LETTERS.doc